॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

*** सुविचार ***
दुसऱ्याच्या दुर्दैवात आनंद मानू नका.

अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. ७ एप्रिल २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३२२ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com



अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्यांविरोधात माकपचे राज्यभर आंदोलन

पान क्र. २ वर



टाकळी ढोकेश्वरमध्ये महावितरण कार्यालयाला टाळे ठोको आंदोलन

पान क्र. ३ वर



घोड धरणातील पाणी साकळाई योजनेकडे वळविण्याच्या प्रस्तावाला श्रीगोंद्यातील शेतकऱ्यांचा विरोध

पान क्र. ४ वर

## SPOT NEWS

### १९ नवीन सदस्यांनी घेतली राज्यसभा खासदारकीची शपथ

● **नवी दिल्ली** – केंद्रीय मंत्री रामदास आठवले आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (एसपी) प्रमुख शरद पवार यांच्यासह १९ नवीन आणि पुन्हा निवडलेल्या राज्यसभा सदस्यांनी सोमवारी शपथ घेतली. शरद पवार व्हीलचेअरवर शपथ घेण्यासाठी संसदेत पोहोचले. शपथ घेणाऱ्यांमध्ये ५ महाराष्ट्राचे, ३ ओडिशाचे, ६ तामिळनाडूचे आणि ५ पश्चिम बंगालचे सदस्य आहेत. राज्यसभेचे सभापती सी.पी. राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत सर्व सदस्यांना शपथ देण्यात आली. १६ एप्रिलपासून तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आले आहे. खरे तर, १० राज्यांमधील ३७ राज्यसभा जागा २ एप्रिल रोजी रिक्त झाल्या होत्या. या जागांसाठी २६ उमेदवार बिनविरोध निवडून आले होते, तर उर्वरित ११ जागांवर १६ मार्च रोजी मतदान झाले होते. खासदारांचा शपथविधी अशा वेळी झाला, जेव्हा संसदेचे अधिवेशन सुरू नव्हते. मात्र, यावेळी उपसभापती हरिवंश आणि संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू उपस्थित होते. किरेन रिजिजू यांनी महिला आरक्षण सुधारणा विधेयकाबाबत सर्व पक्षांना एकत्र येण्याचे आवाहन केले. शपथ घेणाऱ्या नवनिर्वाचित खासदारांची नावे : शरद पवार, माया चिंतामन इवनाते, रामराव सखाराम वडकुते, ज्योती नागनाथ वाघमारे, रामदास आठवले, मनमोहन सामल, संत्रुप्त मिश्रा, दिलीपकुमार राय, बाबुल सुप्रियो, बिस्वजीत सिन्हा, मेनका गुरूस्वामी, राजीव कुमार, रुख्मीणी मलिक, कॉन्स्टेंटाइन रविंद्रन, क्रिस्टोफर मैनिकम, एल के सुधीश, एम थंबीदुरई, तिरुची शिवा, अंबुमणी रामदास यांनी शपथ घेतली.

### अवकाळीने केशर आंब्याचे उत्पादन घटले

● **छत्रपती संभाजीनगर** – विपरीत हवामानामुळे यंदा केशर आंबा उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता असून सुमारे ७० टक्क्यांपर्यंत उत्पादन कमी होईल, असा अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि फळगळ यामुळे बागांना मोठा फटका बसला आहे. गेल्या वर्षी दिवाळीपर्यंत झालेल्या पावसाचा परिणाम यंदाच्या हंगामावरही झाला. फळबागतज्ज्ञांच्या मते, सुरुवातीला ४० टक्के उत्पादन अपेक्षित होते. मात्र, सध्याच्या परिस्थितीत केवळ ३० टक्केच उत्पादन हाती येईल. कोकणातील बागांनाही याचा फटका बसला आहे. दरम्यान, आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्यातही बाधित होण्याची शक्यता आहे. केशर आंब्याची सर्वाधिक निर्यात आखाती देशांमध्ये होत असल्याने उत्पादन घट आणि निर्यात अडचणीमुळे बागायतदारांचे आर्थिक गणित कोलमडण्याची भीती व्यक्त होत आहे. एकीकडे उत्पादन घटले आहे, तर दुसरीकडे आखाती देशात युद्ध सुरू आहे. देशभरातून सर्वाधिक आंब्याची निर्यात आखाती देशात होते. यानंतर अमेरिका, युरोपियन देशांतूनही आपल्या आंब्याला मागणी असते. मात्र, उत्पादन घटल्याने निर्यातही अत्यल्प होईल.

# प्राजक्त तनपुरेंची राहुरी पोटनिवडणुकीतून माघार

## भाजपाकडून अक्षय कर्डिले, राष्ट्रवादी श. प. पक्षाकडून गोविंद मोकाटे यांच्यासह ३० जणांचे ४२ अर्ज दाखल

● **राहुरी । वीरभूमी** – राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी अचानक भाजपाचे प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण व पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी प्राजक्त तनपुरे यांची मनधरणी यशस्वी झाली. यामुळे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी अनपेक्षित माघार घेतली. मात्र राष्ट्रवादीने नवीन चेहऱ्याला निवडणुकीच्या रिंगणात उतरविले आहे. यामुळे भाजपासह राष्ट्रवादी शरद पवार पक्ष, वंचित बहुजन आघाडी व काँग्रेस पक्षासह तब्बल ३० जणांनी ४२ उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.





राहुरी विधानसभा मतदार संघाचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे निधन झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी २३ एप्रिल २०२६ रोजी मतदान होत आहे. आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा अखेरचा दिवस होता. आज अखेर ३० जणांनी ४२ अर्ज दाखल केले असून दि. ७ रोजी दाखल अर्जाची छाननी होणार आहे. तर ९ एप्रिल पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. यानंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट होवून २३ एप्रिल रोजी मतदान व ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे.

राहुरी विधानसभेची पोटनिवडणूक जाहीर झाल्यानंतर भाजपाची उमेदवारी कोणाला मिळेल याबाबत वेगवेगळ्या चर्चा होत होत्या. मात्र स्व. आ. शिवाजीराव कर्डिले यांचे चिरंजीव यांना भाजपाने उमेदवारी जाहीर केली. यामुळे राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांना उमेदवारी दिली जाणार अशी चर्चा होती. मात्र निवडणूक अपक्ष लढायची की पक्षाकडून या गोंधळात असलेले तनपुरे यांची भाजपाच्यावतीने मनधरणी करण्यासाठी भाजपाचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे सोमवारी सकाळी प्राजक्त तनपुरे यांच्या संपर्क कार्यालयात पोहोचले. तनपुरे यांची मनधरणी करण्यात या दोन्ही नेत्याना यश मिळाल्याने अखेर तनपुरे यांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली.

तनपुरे यांची चलबिचल पहाता राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून तनपुरे आणि गोविंद मोकाटे यांना एबी फॉर्म दिले होते. अपेक्षेप्रमाणे तनपुरे यांनी माघार घेतल्याने मोकाटे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्यासह काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीनेही आपले उमेदवार दिले आहेत.

अक्षय कर्डिले यांचा अर्ज दाखल करण्यासाठी मोठे शक्तीप्रदर्शन करण्यात आले. यावेळी भाजपाचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधानपरिषद सभापती राम शिंदे, आ. मोनिकाताई राजळे आदी उपस्थित होते. तर महाविकास आघाडीच्या वतीने राहुरी विधानसभा पोटनिवडणूकीसाठी गोविंद खंडू मोकाटे यांनी अर्ज दाखल केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी- शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप वर्पे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे राहुरी तालुकाध्यक्ष बाळासाहेब आढाव व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी- शरदचंद्र पवार पक्षाचे पाथर्डी तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे यांच्यासह महाविकास आघाडीचे इतरही पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसाअखेर उमेदवारी अर्ज दाखल केलेले उमेदवार पुढीलप्रमाणे – गोविंद खंडू मोकाटे (राष्ट्रवादी शरद पवार पक्ष), इब्राहिम अल्ताफ शेख (अपक्ष), बिलाल गफूरभाई शेख (अपक्ष), उमेश महादेव म्हेत्रे (अपक्ष), सुर्यभान दत्तात्रय लांबे (काँग्रेस), रावसाहेब सदाराम खेवरे (अपक्ष), अक्षय शिवाजीराव कर्डिले (भाजपा), संभाजी लक्ष्मण धोंडे (अपक्ष), नागेश विलास जाधव (अपक्ष), रविंद्र बापुसाहेब मोरे (अपक्ष), इम्रान नबी देशमुख (अपक्ष), बाळासाहेब सोमा जाधव (वंचित बहुजन आघाडी), संतोष एकनाथ चोळके (वंचित बहुजन आघाडी), दत्तात्रय नारायण म्हैस (अपक्ष), त्रिशला मिलिंद कांबळे (अपक्ष), शिवाजी आनंदा कदम (अपक्ष), सखाहरी शांताराम बर्डे (अपक्ष), प्रवीण सुभाष दळवी (अपक्ष), नामदेव बंडू पवार (अपक्ष), अनिल भिकाजी जाधव (अपक्ष), सुदर्शन लक्ष्मण शितोळे (हिंदू एकता आंदोलन), बाळू बापुराव कोळसे (अपक्ष), साहेबराव पाटीलबा म्हसी (अपक्ष), अथर्व साहेबराव म्हसे (काँग्रेस), नंदकुमार भागवत खेमनर (अपक्ष), महेश केशव हापसे (अपक्ष), सोहम बापुसाहेब चिंधे (लोकशाही पार्टी), प्रतिमा किशोर देसर्डा (अपक्ष), सविता रामचंद्र शेटे (अपक्ष), शोएब सुथेदार शेख (अपक्ष) असे एकुण ३० जणांनी ४२ अर्ज दाखल केले आहेत.

## माध्यमिक शिक्षक २१ एप्रिल पासून बेमुदत संपावर

● **अहिल्यानगर । वीरभूमी**– अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघटनेची कार्यकारिणीची बैठक नुकतीच माध्यमिक शिक्षक भवनात पार पडली. संघटनेचे जिल्हाध्यक्ष सचिन झगडे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक घेण्यात आली.

महाराष्ट्र शिक्षक फेडरेशनचे उपाध्यक्ष चांगदेवराव कडू यांनी जिल्हा संघटनेने फेडरेशनने ठरवून दिलेल्या दिशा निर्देशामध्ये काम केले पाहिजे असे आवाहन कार्यकारिणीला केले. संघटनेचे मार्गदर्शक शिवाजीराव ढाळे यांनी संघटनेच्या संघर्षाचा इतिहास आणि याआधी संघटनेने केलेल्या आंदोलनाचे यश यांचा आढावा घेतला.

माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे व राज्य संघटनेचे कोषाध्यक्ष राजेंद्र लांडे यांनी संघटनेच्या कार्याचा आढावा व येणाऱ्या काळात संघटनेच्या दिशादर्शनाबाबत मार्गदर्शन केले.




जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे यांनी शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न त्यामध्ये सुधारीत पेन्शन योजना, टीईटीची सक्ती, संच मान्यतेच्या जाचक अटी, पट पडताळणीचे बदलेले निकष, कायम विना अनुदानित शाळांचे स्वयं अर्थसाहित शाळांमध्ये रूपांतरण, शिक्षकेतर बांधवांचे प्रश्न, सरकार जाणीवपूर्वक विविध प्रश्न निर्माण करून संघटना शिक्षकांमध्ये भेद निर्माण करत असल्याचे निदर्शनास आणून दिले. मध्यवर्ती कर्मचारी संघटना व समन्वय समितीच्या माध्यमातून होत असल्याने कर्मचाऱ्यांनी कोणतीही भीती मनात बाळगू नये. या पार्श्वभूमीवर केवळ शिक्षण क्षेत्रातीलच नव्हे तर समाजातील सर्व घटकांनी २१ तारखेपासून सुरू होणाऱ्या बेमुदत संपामध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे निर्धार व्यक्त केला.

यावेळी बैठकीस मार्गदर्शक शिवाजीराव ढाळे, चेअरमन अप्पासाहेब शिंदे , राज्य कोषाध्यक्ष राजेंद्र लांडे , राज्य उपाध्यक्ष चांगदेव कडू , उपाध्यक्ष भालचंद्र देशमुख (कर्जत), मोहन यादव (जामखेड), संदिप शेंडगे, खजिनदार अशोक सोनवणे (नेवासा), प्रशांत होन(श्रीरामपूर), माजी अध्यक्ष शिरीष टेकाडे, सचिन जाधव (कोपरगाव) तसेच जिल्ह्यातील प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीचे प्रास्ताविक संघटनेचे सेक्रेटरी अमोल ठाणगे यांनी केले. सूत्रसंचालन उपाध्यक्ष सोमनाथ सुंबे तर आभार हिशोब तपासणीस शिवदास सातपुते यांनी मानले.

## संपूर्ण बारामती माझे कुटुंब : सुनेत्रा पवार

● **बारामती । वीरभूमी** – अजित पवारांच्या निधनानंतर सुनेत्रा पवारांनी बारामती पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरण्यापूर्वी भावूक आवाहन केले. ‘फक्त पार्थ आणि जय नाही, तर संपूर्ण बारामती माझं कुटुंब आहे,’ या त्यांच्या विधानाने उपस्थितांना गहिवरून आले. अजितदादांचा वारसा पुढे नेण्याचे आश्वासन देत, त्यांनी बारामतीच्या विकासाची प्रतिज्ञा केली. त्यांच्या या हृदयस्पर्शी शब्दांनी महाराष्ट्राच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या.

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी लगेच उपमुख्यमंत्रीपदाची कमान हाती घेऊन पक्षाची सुत्रेही हाती घेतली. अजितदादा नेहमी जनतेच्या सेवेत मग्न असायचे. त्याच पावलावर पाऊल ठेवून सुनेत्रा पवार यांनीही स्वत:ला जनसेवेत झोकून दिले. नागरिकांच्या समस्या सोडवण्यावर त्यांनी भर दिला. आता त्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीला सामोरे जात आहेत. या निवडणुकीचा अर्ज भरण्यापूर्वी त्यांनी बारामतीकरांना संबोधित केलं. दादा गेल्यानंतर पहिल्यांदाच त्यांनी बारामतीकरांना संबोधित केले. यावेळी बोलताना त्यांचा कंठ दाटला होता. त्यांना गहिवरून आले होते. कंठ दाटलेला असतानाच त्यांनी एक विधान केले. त्याने केवळ बारामतीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेच्या डोळ्याच्या कडा पाणवल्या. त्या म्हणाल्या, फक्त पार्थ आणि जय माझं कुटुंब नाही. तर संपूर्ण बारामतीकर माझं कुटुंब आहे. त्यांनी हे वाक्य उच्चारताच अनेकांच्या मनात घालमेल झाली अन् डोळ्यात टचकन पाणी आलं.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख आणि तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा २८ जानेवारी रोजी बारामती येथे विमान अपघातात मृत्यू झाला. त्यांच्या निधनाने फक्त बारामती नव्हे तर अखख्या राज्यावर दु:खाचा डोंगर कोसळला. त्यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभेच्या जागेवर लवकरच पोटनिवडणूक होणार असून सुनेत्रा पवार या ही निवडणूक लढवणार आहेत. त्याच निवडणुकीच्या उमेदवारीचा अर्ज भरण्यासाठी आज त्या बारामती येथे आल्या होत्या. त्याआधी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांचा मेळावा झाला. त्यावेळी जय पवार, पार्थ पवार ही त्यांची मुलं, सून, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे सर्व प्रमुख नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे हेही उपस्थित होते.

बारामतीकरांशी मनाचा संवाद साधताना त्यांनी सर्वांना आश्वासन देत बारामतीचा विकास असाच चालू राहील असा शब्द दिला. फक्त जय आणि पार्थ हेच माझं कुटुंब नव्हे तर संपूर्ण बारामती माझं कुटुंब आहे. त्यांच्या तोंडून हे वाक्य ऐकताच उपस्थित सगळेच गहिवरले, अनेकांना अश्रू अनावर झाले. बारामतीची प्रतिष्ठा कमी होणार नाही याचे वचन देते, असंही सुनेत्रा पवार यावेळी म्हणाल्या.

# गॅस टंचाईच्या निषेधार्थ वंचितचे जिल्हाधिकारी कार्यालयावर चूल पेटवून आंदोलन

## सिलेंडरअभावी नागरिक त्रस्त; काळाबाजार रोखण्यासह तातडीने पुरवठा सुरळीत करण्याची मागणी

● **अहिल्यानगर । वीरभूमी**– राज्यभर सुरू असलेल्या गॅस टंचाईमुळे सर्वसामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन पूर्णतः विस्कळीत झाले आहे. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने ‘नरेंद्र, कब मिलेगा सिलेंडर?’ अशा घोषणाबाजी करत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर चूल पेटवून आंदोलन करण्यात आले.

जिल्हाध्यक्ष योगेश साठे आणि शहराध्यक्ष हनीफ शेख यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. यावेळी जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि प्रांताधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गॅस टंचाईमुळे स्वयंपाकघरातील गॅस शेगड्या थंड पडल्या असून चहाच्या टपऱ्या, फूड स्टॉल्स आणि लहान व्यावसायिकांचे व्यवसाय ठप्प झाले आहेत. अनेकांना कोळसा आणि लाकडाच्या चुलीवर स्वयंपाक करावा लागत आहे.

दरम्यान, अकोला येथे गॅस सिलेंडरसाठी रांगेत उभे असताना माजी सरपंच शंकरराव शिरसाठ यांचा मृत्यू झाला, तर अमरावतीमध्येही अशाच प्रकारे एका तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनांमुळे परिस्थितीची गंभीरता अधोरेखित होत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

गॅस टंचाईचा फटका केवळ घरगुती वापरापुरता मर्यादित नसून, हॉटेल्स, केटरिंग व्यवसाय, रिक्षाचालक तसेच विद्यार्थ्यांच्या मेस सेवांवरही मोठा परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी गॅसच्या अभावामुळे लग्नसमारंभ आणि धार्मिक कार्यक्रम पुढे ढकलण्यात आले आहेत. रिक्षाचालकांनीही मोर्चे काढून आपला आक्रोश व्यक्त केला आहे.

वंचित बहुजन आघाडीचे नेते बाळासाहेब आंबेडकर यांनी ११ मार्च रोजी दिलेला इशारा आता प्रत्यक्षात उतरल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला. केंद्र आणि राज्य सरकार परिस्थिती सामान्य असल्याचा दावा करत असताना प्रत्यक्षात नागरिकांना गॅससाठी तासन्तास रांगेत उभे राहावे लागत असल्याची टीकाही करण्यात आली.

याशिवाय, अनेक ठिकाणी गॅस सिलेंडरचा काळाबाजार होत असून काही ठिकाणी ५ ते ७ हजार रुपयांपर्यंत दर आकारला जात असल्याचा आरोप करण्यात आला. काही ठिकाणी सिलेंडरमध्ये पाणी भरून देण्यासारखे प्रकारही समोर आल्याचे निवेदनात नमूद आहे.

मुख्य मागण्या पुढीलप्रमाणे : गॅस सिलेंडरची कृत्रिम टंचाई तात्काळ थांबवावी, काळाबाजार रोखून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, २५ दिवसांनंतर गॅस मिळण्याची अट शिथिल करावी, विद्यार्थ्यांसाठी कम्युनिटी किचन सुरू करावे, प्रत्येक २ किमी अंतरावर गरजूंसाठी अन्न व्यवस्था करावी, गॅस पुरवठा कधी सुरळीत होणार याबाबत स्पष्ट माहिती द्यावी, केवायसी नसल्यामुळे गॅस नाकारण्याचे प्रकार थांबवावेत. उज्ज्वला योजनेअंतर्गत वितरणाचे जिल्हानिहाय ऑडिट करावे.

या वेळी शहराध्यक्ष हनीफ शेख, शहर महासचिव प्रवीण ओरे, भिंगार शहराध्यक्ष राजीव भिंगारदिवे, नगर तालुकाध्यक्ष रविकिरण जाधव, जिल्हा महासचिव प्रसाद भिवसने, जिल्हा उपाध्यक्ष योगेश क्षीरसागर, जिल्हा संघटक सुधीर ठोंबे, अमर निरभावाने, संकेत शिंदे, प्रज्योत शिर्के, देविदास भालेराव, संतोष पवार, सुनील सकट, सुरेश पानपाटील आदींसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# SPOT NEWS

## बाबासाहेब गवते यांना महाराष्ट्र भूषण आदर्श शिक्षक पुरस्कार



**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
समता प्रतिष्ठानच्या (महाराष्ट्र राज्य) वतीने शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल बाबासाहेब जालिंदर गवते यांनामहाराष्ट्र भूषण आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

नुकतेच झालेल्या शिक्षकांच्या सन्मान सोहळ्यात पदवीधर आमदार सत्यजित तांबे यांच्या हस्ते गवते यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. आमदार सत्यजित तांबे यांनी गवते यांच्या कार्याचे कौतुक करुन समाज घडविण्याच्या प्रक्रियेत शिक्षकाची भूमिका कणा मानली जाते. गवते यांनी आपल्या ज्ञानदानाबरोबरच कर्तृत्वातून विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. अशा निष्ठावान शिक्षकांचा सन्मान करणे हे समाजाचे कर्तव्य आहे. त्यांचे कार्य इतर शिक्षकांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि विविध सामाजिक क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या लाभार्थ्यांसाठी बैठकीचे आयोजन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांसाठी ७ एप्रिल २०२६ रोजी 'संवाद व आढावा' बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडणार असल्याची माहिती जिल्हा समन्वयक आकाश बोठे यांनी दिली. अहिल्यानगर येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रांतर्गत हे महामंडळ कार्यरत आहे. या योजनांचा लाभ घेत असलेल्या जिल्ह्यातील लाभार्थ्यांच्या अडचणी व समस्यांचे निराकरण करण्यासाठी, तसेच त्यांना योजनांबाबत अधिक प्रभावी मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक मंगळवारी सकाळी ११ ते सायंकाळी ४ या वेळेत जिल्हा मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमध्ये पार पडेल. जिल्ह्यातील सर्व संबंधित लाभार्थ्यांनी या बैठकीस आवर्जून उपस्थित राहून आपल्या समस्यांचे निराकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा समन्वयक आकाश बोठे यांनी केले आहे.

## अकोले पोलीस ठाण्यातील जप्त व बेवारस वाहनांसाठी मालकांना सात दिवसांची मुदत

**● अकोले । वीरभूमी–**
अकोले पोलीस स्टेशनच्या आवारात मागील काही वर्षांपासून विविध कंपन्यांच्या दुचाकी, चारचाकी तसेच ट्रकसारखी वाहने पडून आहेत. ही वाहने अभिलेखावरील गुन्ह्यांतील तसेच बेवारस जप्त केलेली आहेत. सदर मोटारसायकली, चारचाकी वाहने व ट्रक यांचे ताबा घेण्यासाठी अद्याप कोणताही मालक पुढे आलेला नाही. ज्या नागरिकांची मोटारसायकल, चारचाकी किंवा ट्रकसारखी वाहने अकोले पोलीस स्टेशन येथे जमा आहेत किंवा पडून आहेत, त्यांनी आपल्या वाहनांचे नोंदणी दस्तऐवज (कागदपत्रे) समक्ष सादर करून संपर्क साधावा. संबंधित कागदपत्रांची अधिकृत खात्री व नोंदणी पडताळणी करून पुढील सात दिवसांच्या आत आपली वाहने ताब्यात घ्यावीत. दिलेल्या सात दिवसांच्या मुदतीत कोणीही वाहनाची खात्री करून ताब्यात न घेतल्यास, संबंधित वाहनांचा नियमाप्रमाणे लिलाव करण्यात येईल व पुढील कायदेशीर प्रक्रिया राबविण्यात येईल, याची नोंद घ्यावी. असे आवाहन अकोले पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांनी केले आहे.

# अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्यांविरोधात माकपचे राज्यभर आंदोलन

### भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणी मंत्री, आमदार व अधिकाऱ्यांच्या हकालपट्टीची मागणी

**● अकोले । वीरभूमी –**
भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणी अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या मंत्री, आमदार व अधिकाऱ्यांच्या हकालपट्टीच्या मागणीसाठी माकपच्या वतीने राज्यभर तीव्र आंदोलन करण्यात आले. राज्यात तंत्र-मंत्र, अंगारे-धुपारे करून अडचणीत सापडलेल्या नागरिकांचे व महिलांचे शोषण करण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील अशोक खरात या बुवा-बाबाने अशाच प्रकारे अनेक महिलांचे व सामान्य नागरिकांचे शोषण केल्याचे समोर आले असून, मोठ्या प्रमाणात लोक त्याचे बळी ठरले आहेत.




अशोक खरात यांच्या या कारस्थानात महिला आयोगाच्या अध्यक्षांसह अनेक मंत्री, आमदार, लोकप्रतिनिधी व अधिकारी हे एकतर सामील आहेत किंवा बळी पडलेले आहेत, असा आरोप करण्यात आला आहे. संविधानिक पदांवर असलेल्या या लोकप्रतिनिधींनी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारून समाजात तो रुजविण्याची अपेक्षा असताना, ते स्वतःच अंधश्रद्धेचे समर्थक किंवा वाहक बनत असल्याची टीका करण्यात आली. अशा व्यक्तींना समाजात प्रतिष्ठा असल्याने सामान्य नागरिक अंधश्रद्धांना बळी पडत असल्याचेही नमूद करण्यात आले.

देशात व राज्यात सत्तेवर असलेल्या विचारसरणीमुळे श्रद्धेच्या नावाखाली अंधश्रद्धांना पाठबळ मिळत असल्याचा आरोप करण्यात आला. बुवाबाजीला शरण जात राज्यातील ३९ आमदार अशोक खरात यांच्या भोंदूगिरीत सामील झाल्याचे समोर येत असल्याचेही सांगण्यात आले. तसेच अनेक सामाजिक, राजकीय कार्यकर्ते, प्रतिनिधी व अधिकारी यांचाही यात सहभाग असल्याचा आरोप आहे.

अशोक खरात यांच्यासारखेच राज्यातील गावागावांत व शहरांमध्ये अनेक बुवा-बाबा तयार झाले असून, ते भोळ्या-भाबड्या नागरिकांचे विविध प्रकारे शोषण करत आहेत. या प्रकारांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी व दोषींवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने ६ एप्रिल २०२६ रोजी राज्यभर आंदोलन छेडले.

राज्यातील २१ जिल्ह्यांत या आंदोलनाचे पडसाद उमटले. अनेक ठिकाणी पुतळे जाळून नागरिकांनी संताप व्यक्त केला, तर मोर्चे व निदर्शने करून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या आंदोलनातून पुढील प्रमुख मागण्या करण्यात आल्या: भोंदूबाबा अशोक खरात व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी; त्यांची संपूर्ण मालमत्ता जप्त करून ती अंधश्रद्ध निर्मूलनासाठी वापरावी; प्रकरणात सामील असल्याचे सांगितल्या जाणाऱ्या ३९ आमदारांची नावे जाहीर करावीत व त्यांचे तत्काळ राजीनामे घ्यावेत. तसेच पीडित महिलांचे व्हिडिओ सोशल मीडियावरून तात्काळ हटवावेत, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय, अशा प्रकारच्या भोंदूगिरीला समर्थन देणाऱ्या सर्व लोकप्रतिनिधींवर व संबंधितांवर कठोर कारवाई करावी; राज्यभरातील भोंदू बाबांविरोधात विशेष मोहीम राबवावी; प्रत्येक पोलीस ठाण्यात अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष स्थापन करावा; जादूटोणा विरोधी कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी; तसेच सोशल मीडियावरून अंधश्रद्धा पसरवणाऱ्या जाहिरातींवर बंदी आणून त्यांचे नियमन करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा स्थापन करावी, अशा मागण्याही करण्यात आल्या. अशी माहिती भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) चे राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी दिली.

## संतोष कानडे यांच्या 'पुस्तक भेट' उपक्रमाचे विधान परिषदेचे सभापती शिंदे यांच्याकडून कौतुक

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
साहित्य वाचनामुळे समाज अधिक सृजनशील, विचारशील आणि प्रगल्भ बनतो, असे प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले. ते अहिल्यानगर येथे एका कार्यक्रमानिमित्त आले असता सामाजिक कार्यकर्ते संतोष कानडे यांनी त्यांची भेट घेऊन त्यांना पुस्तक भेट देत आपल्या विविध सामाजिक उपक्रमांची सविस्तर माहिती दिली.

सामाजिक कार्यकर्ते संतोष कानडे गेल्या काही वर्षांपासून 'पुस्तक भेट' हा उपक्रम सातत्याने राबवत आहेत. या उपक्रमाअंतर्गत त्यांनी विविध शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक वाचनालये तसेच शालेय विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर पुस्तके भेट दिली आहेत.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणे आणि समाजात वाचन संस्कृती वाढवणे हा आहे. आजच्या डिजिटल युगात पुस्तकांपासून दूर जाणाऱ्या पिढीला पुन्हा वाचनाकडे वळवण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावत आहे. संतोष कानडे यांनी सांगितले की, वाढदिवस, राष्ट्रपुरुषांच्या जयंती, संविधान दिन तसेच विविध राष्ट्रीय दिनांच्या निमित्ताने लोक सहसा इतर वस्तू भेट देतात. मात्र, त्याऐवजी पुस्तक भेट देण्याची सवय लावल्यास समाजात सकारात्मक बदल घडू शकतो.

पुस्तक हेच खरे ज्ञानाचे दार उघडणारे साधन आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या आनंदाच्या क्षणी पुस्तक भेट देण्याची परंपरा रुजवावी, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्रा. राम शिंदे यांनी संतोष कानडे यांच्या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. त्यांनी म्हटले की, अशा प्रकारचे उपक्रम समाजाला योग्य दिशा देणारे आहेत. वाचन संस्कृती वाढवणे ही काळाची गरज आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विचारशक्ती वाढून एक सुदृढ आणि सृजनशील समाज घडू शकतो.

आजच्या तंत्रज्ञानप्रधान जीवनशैलीत वाचनाची सवय कमी होत चालली आहे. अशा परिस्थितीत संतोष कानडे यांसारखे कार्यकर्ते समाजात वाचनाची जागृती निर्माण करत असून, त्यांचा हा प्रयत्न समाजासाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे स्पष्ट केले.

## भगवानगडाच्या नारळी सप्ताहाचा आज समारोप; बडेवाडीत दिग्गजांची उपस्थिती

### महंत डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता

**● पाथर्डी । वीरभूमी–**
श्रीसंत भगवानबाबांनी प्रारंभ केलेल्या नारळी सप्ताहाच्या ९२ व्या वर्षाचे यजमानपद पाथर्डी तालुक्यातील बडेवाडी या गावाने स्वीकारले आहे. श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प. महंत डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह सुरू असून, आज काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाचा समारोप होत आहे.

श्री संत भगवानबाबांनी सुमारे ९२ वर्षांपूर्वी श्री क्षेत्र नारायणगडाच्या पायथ्याशी असलेल्या पखालडोह येथे फिरता नारळी सप्ताहाचा उपक्रम सुरू केला होता. त्यांच्या पश्चात ही परंपरा श्री क्षेत्र भगवानगडाचे द्वितीय उत्तराधिकारी वै. ह.भ.प. गुरुवर्य श्री संत भीमसिंह महाराज यांनी पुढे चालू ठेवली. त्यांच्या वैकुंठगमनानंतर विद्यमान मठाधिपती ह.भ.प. महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली सप्ताहाने वेगळी ओळख निर्माण केली आहे.

नारळी सप्ताहाचे वैभव मोठे असल्याने संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो भाविक आठवडाभर उपस्थित राहतात. नारळाचे यजमानपद स्वीकारलेल्या बडेवाडी ग्रामस्थांनी तन, मन आणि धन अर्पण करून श्रीगुरूंची सेवा केली आहे. ३१ मार्च रोजी या महोत्सवाचा प्रारंभ झाला. सप्ताहात भागवताचार्य ह.भ.प. प्रकाश महाराज साठे यांच्या अमृततुल्य, रसाळ वाणीमधून सात दिवस भव्य श्रीमद् भागवत कथा निरूपण सोहळा पार पडला, ज्याचा लाभ हजारो भाविकांनी घेतला.

आज काल्याच्या दिवशी श्री क्षेत्र भगवानगडाचे महंत डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांचे काल्याचे कीर्तन होणार असून, त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल. आजच्या समारोपाच्या दिवशी माजी मंत्री धनंजय मुंडे, राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार मोनिकाताई राजळे, माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार बाळासाहेब आजबे, ओबीसी नेते प्रा. लक्ष्मणराव हाके, प्रतापराव ढाकणे यांच्यासह अनेक दिग्गज व मातब्बर नेत्यांची उपस्थिती राहणार आहे.

## अक्षर संस्कार शिबिरातून सजग व सुसंस्कारित पिढीची निर्मिती : नगराध्यक्ष अभय आव्हाड

**● पाथर्डी । वीरभूमी–**
वसंतराव नाईक वाचन मंदिराच्या वतीने सामाजिक कार्यातून पुढच्या पिढीसाठी जपत असलेला सेवाभाव हा निश्चितपणे कौतुकास्पद असून अक्षर संस्कार शिबिरातून घडणारी पुढची पिढी ही निश्चितपणे सजग व सुसंस्कारित बनेल, असे प्रतिपादन नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले.

शहरातील आनंदनगर येथील वसंतराव नाईक वाचन मंदिर या संस्थेच्या वतीने श्री सद्गुरू संत सेवालाल महाराज मंदिर सभागृहात आयोजित अक्षर संस्कार शिबिर २०२६ चे उद्घाटन करताना आव्हाड बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते अशोकराव चोरमले, जिल्हा ग्रंथालय संघाचे कोषाध्यक्ष विष्णुपंत पवार, जवाहर विद्यालयाच्या माजी मुख्याध्यापिका रत्नमाला साखरे, एस टी कामगार सेनेचे कार्याध्यक्ष संतोष आंधळे, शिक्षक नेते गहिनीनाथ शिरसाठ, ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष दिलीप नागरगोजे, प्रा.सविता पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष पदावरून बोलताना चोरमले म्हणाले की, हल्ली संगणक आणि मोबाईलच्या युगात अक्षराला काही महत्व नाही असे वाटणं स्वभाविक आहे. पण अक्षरामुळे मुलांच्या कलागुणांना वाव मिळतो. वळणदार अक्षरामुळे मुलांचे व्यक्तिमत्व उठून दिसते.

पाथर्डी शहरातून व तालुक्यातून भरभरून प्रतिसाद या शिबिराला मिळत आहे. या अक्षर संस्कार शिबिराची जबाबदारी प्रा. सविता पवार, प्रा. सचिन चव्हाण आणि शिवाजी चव्हाण यांनी स्वीकारली आहे.




यावेळी डॉ. अभिजित पवार, सुधीर सुडके, महेश साखरे, कौतुक चिंतामणी, वैभव साप्ते, किशोर सानप आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सचिन चव्हाण, प्रास्ताविक विलास पवार यांनी केले तर डॉ. संदीप पवार यांनी आभार मानले.

# भाजपचा वटवृक्ष कार्यकर्त्यांच्या संघर्षातून उभा राहिलेला आहे

### प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण । 'राष्ट्र प्रथम' मंत्रासह भाजपाचा विस्तार; पक्षाच्या ४७ व्या वर्षात प्रवेशानिमित्त चव्हाण यांची प्रतिक्रिया

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
सोमवारी भारतीय जनता पक्षाचा स्थापना दिन आहे. ६ एप्रिल १९८० रोजी पक्षाची स्थापना झाली. पक्षाने ४६ वर्षे पूर्ण करून ४७व्या वर्षात पदार्पण केले आहे. या निमित्ताने महाराष्ट्र भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी लेख लिहून आपले विचार मांडले आहेत. सामान्य कार्यकर्ता ते पक्षाचा प्रदेशाध्यक्ष हा प्रवास फक्त भाजपसारख्या संघटनेतच शक्य असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांनी पुढे लिहिले की, विचारधारेच्या घट्ट मुळांनी मातीत रुजलेला आणि कार्यकर्त्यांच्या संघर्षातून उभा राहिलेला भारतीय जनता पक्षाचा विशाल वटवृक्ष आज ४७व्या वर्षात पदार्पण करत आहे. ६ एप्रिल १९८० रोजी रोवलेले हे बीज आज सुमारे २५ कोटींहून अधिक कार्यकर्त्यांच्या मेहनतीने संपूर्ण देशभर विस्तारले आहे.

रवींद्र चव्हाण पुढे म्हणाले की, भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता, भाजयुमोचा उपाध्यक्ष, नगरसेवक, आमदार, कॅबिनेट मंत्री आणि आता प्रदेशाध्यक्ष या नात्याने जेव्हा मी पक्षाच्या इतिहासाकडे पाहतो, तेव्हा मला जाणवतं की जसे विचारधारेने एक एक कार्यकर्ते घडवले आणि त्याचप्रमाणे असंख्य ध्येयवादी कार्यकर्त्यांनी त्यांच्या रक्ता-घामाने गुरुदक्षिणा म्हणून पक्षाला घडवले. जेव्हा नेहरू-गांधींची अल्पसंख्याक-केंद्रित समाजवादी विचारसरणी आणि साम्यवादी चळवळींचा जागतिक प्रभाव होता, त्या काळात जनसंघाच्या माध्यमातून बहुसंख्य पण वंचित समाजाला केंद्रस्थानी ठेवण्याचे आणि प्रवाहाच्या विरुद्ध पोहण्याचे धैर्य डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी, पंडित दीनदयाल उपाध्याय आणि अटल बिहारी वाजपेयी यांसारख्या नेत्यांनी दाखवले. त्यांची दूरदृष्टी आजही आमच्यासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे.

### भाजपच्या या प्रवासात अनेक दिग्गज नेत्यांचे योगदान


वैचारिक पाया आणि नेतृत्वाची परंपरा लाभलेल्या भाजपच्या या प्रवासात अनेक ऋषितुल्य नेत्यांचे मोठे योगदान राहिले आहे. महाराष्ट्र भाजपाचाच विचार करायचा झाला तर १९८० मध्ये उत्तमराव पाटील यांनी पहिले प्रदेशाध्यक्ष म्हणून पक्षाचा पाया रचला. त्यानंतर गोपीनाथ मुंडे यांनी पक्षाला गावागावात नेले आणि बहुजन व ओबीसी समाजाला मुख्य प्रवाहात आणत अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. १९९५ मध्ये काँग्रेसची सत्ता हटवण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. प्रा. ना. स. फरांदे यांनी पक्षाला वैचारिक बळ दिले, तर सूर्यभान वहाडणे पाटील यांनी शिस्तबद्ध नेतृत्वातून संघटना मजबूत केली. भाऊसाहेब फुंडकर यांनी शेतकऱ्यांसाठी लढा देत पक्षाला शेतशिवारापर्यंत पोहोचवले. प्रमोद महाजन यांच्या निधनानंतर नितीन गडकरी यांनी कार्यकर्त्यांना सावरत संघटनेला नवी ऊर्जा दिली.

सुधीर मुनगंटीवार यांनी जनसंपर्काचा नवा अध्याय सुरू केला. २०१३ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने मोठी झेप घेतली आणि प्रदेशाध्यक्षपदावरून थेट मुख्यमंत्रीपदावर जाण्याचा अनोखा विक्रम घडला. त्यानंतर रावसाहेब दानवे, चंद्रकांत पाटील आणि चंद्रशेखर बावनकुळे यांनी संघटना आणि सरकार यांच्यात उत्तम समन्वय साधत पक्षाला शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवले.

### जातीय राजकारणाला भाजपचे ठाम प्रत्युत्तर

कधी 'शेटजी-भटजी'ची पार्टी म्हणून टीका झालेल्या भाजपने ४६ वर्षांत महाराष्ट्रात ११ बहुजन समाजातील प्रदेशाध्यक्ष दिले, जे जातीय राजकारण करणाऱ्यांना ठोस उत्तर आहे. आज एक कार्यकर्ता म्हणून प्रदेशाध्यक्षाची जबाबदारी सांभाळताना, मला अभिमान वाटतो की सामान्य कार्यकर्त्यापासून या पदापर्यंत पोहोचणे केवळ भाजपातच शक्य आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील यश हे केवळ आकडे नसून जनतेचा विश्वास असल्याचे त्यांनी नमूद केले.





### भारतीयत्व म्हणजेच 'राष्ट्रीयत्व' हा विचार तळागाळात

भाजप ही केवळ बॅनर आणि सभांची संघटना नसून विचारधारेवर उभे असलेले कार्यकर्ते हीच तिची खरी ताकद आहे. 'भारतीयत्व म्हणजेच राष्ट्रीयत्व' हा विचार आम्ही तळागाळापर्यंत पोहोचवला आहे. आम्हाला अनेकदा अति राष्ट्रवादी म्हटले जाते; पण देशाबद्दल अभिमान बाळगणे हा दोष असेल, तर तो आम्ही आनंदाने स्वीकारू. 'राष्ट्र प्रथम'ही आमच्या विचारधारेची मूळ भूमिका आहे. काळानुसार तंत्रज्ञानाचा स्वीकार करत भाजप एक 'टेक-फ्रेंडली' संघटना बनत आहे, ज्यामुळे बूथ स्तरापर्यंत कार्यकर्त्यांशी तात्काळ संपर्क साधणे शक्य झाले आहे. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राबवण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे.

### ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल

भारताला ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवणे आणि त्यात महाराष्ट्राचा १ ट्रिलियन डॉलरचा वाटा सुनिश्चित करणे, यावर विशेष भर दिला जात आहे. या योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे आणि गावपातळीवरील समस्या शासनापर्यंत नेणे, हे प्रत्येक कार्यकर्त्याचे कर्तव्य आहे. हाच 'अंत्योदय'चा खरा अर्थ आहे. जेव्हा प्रत्येक भाजप कार्यकर्ता या भावनेने काम करेल, तेव्हाच 'विकसित भारत'चे स्वप्न साकार होईल आणि विकसित महाराष्ट्राशिवाय ते शक्य नाही.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## ७ एप्रिलपासून राज्यभर कामबंद आंदोलनाचा इशारा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्य आर्थिक अडचणीत सापडल्यामुळे विकासकामे करणाऱ्या कंत्राटदार व विकासकांची देयके मोठ्या प्रमाणावर थकलेली आहेत. निधीअभावी ही देयके अदा होत नसल्याने राज्यभरातील सर्व विकासकामे दि. ७ एप्रिल २०२६ पासून कामबंद आंदोलनाद्वारे बंद ठेवण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना व महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. यासंदर्भात मा. जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात म्हटले आहे की, नोव्हेंबर २०२५ मध्ये मोठ्या गाजावाजात सत्तेत आलेल्या सरकारला आज १७ महिने पूर्ण झाले असले तरी प्रत्यक्षात आर्थिक स्थिती अत्यंत खालावलेली आहे. अर्थसंकल्पात मोठमोठी आश्वासने देण्यात आली, मात्र प्रत्यक्षात राज्याची तिजोरी रिकामी असल्याचे चित्र आहे. राज्यातील विविध विभागांमध्ये प्रलंबित देयकांची आकडेवारी चिंताजनक आहे. सार्वजनिक बांधकाम विभागात मागील वर्षी ३७,००० कोटींपैकी अद्याप २९,००० कोटी बाकी आहेत. जलजीवन मिशन व महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरणात ३९,००० कोटींपैकी ३५,००० कोटी प्रलंबित आहेत. ग्रामविकास व जलसंधारण विभागात ८,५०० कोटींपैकी ६,५०० कोटी, पर्यटन विकास महामंडळात ४,३०० कोटींपैकी ३,८०० कोटी, नगरविकास विभागात २,७०० कोटींपैकी २,१०० कोटी, जलसंपदा विभागात ११,००० कोटींपैकी ९,००० कोटी तर जिल्हा नियोजन समिती व इतर विभागांमध्ये १४,००० कोटींपैकी ११,००० कोटी देयके अद्याप बाकी आहेत. याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्था व महानगरपालिकांकडेही निधीअभावी नवीन कामे सुरू झालेली नाहीत आणि तेथील प्रलंबित देयकांचाही आकडा मोठ्या प्रमाणावर आहे. या पार्श्वभूमीवर मा. मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच संबंधित मंत्र्यांना २६ फेब्रुवारी २०२६ व ३ मार्च २०२६ रोजी लेखी निवेदन देण्यात आले होते.

## शिवाजीराव चव्हाण यांचे निधन


**● अहिल्यानगर । वीरभूमी –**



येथील ज्येष्ठ नागरिक शिवाजीराव मुरलीधर चव्हाण यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते. त्यांच्या मागे पत्नी, तीन मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार होता. मूळचे बऱ्हाणपूर (ता. नेवासा) येथील असलेले शिवाजीराव चव्हाण हे ठाणे येथे सँडोज इंडिया लिमिटेड या बहुराष्ट्रीय कंपनीत जनरल मॅनेजर पदावरून निवृत्त झाले होते. ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ते नगरला स्थायिक झाले. ते मनमिळावू व शिस्तप्रिय होते. सी. जी. पॉवर कंपनीचे अधिकारी मिलिंद वाळके यांचे ते सासरे, तर छत्रपती इंजिनीअरिंग कॉलेजच्या विभागप्रमुख डॉ. शिल्पा वाळके यांचे ते वडील होत. चव्हाण यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

## विजय वैद्य यांचे निधन

**● अकोले । वीरभूमी –**



तालुक्यातील सुगाव खुर्द येथील विजय गंगाधर वैद्य (वय ७३) यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, सुन, नातवंडे, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे. सुगाव खुर्द अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी गंगाधर रामचंद्र वैद्य यांचे ते ज्येष्ठ चिरंजीव तर माजी सरपंच विष्णू रामचंद्र वैद्य यांचे ते पुतणे होत. भारत सरकारचे नोटरी अँड. रो.बाळासाहेब वैद्य व डॉ. जयश्री जाधव यांचे ते बंधू होत. विवेक वैद्य, सौ.उषा पोपट घनवट, सौ. वृंदा अनिल शिंदे यांचे ते वडील होत.

## नानासाहेब नाईकवाडी यांचे निधन

**● अकोले । वीरभूमी –**

अकोले तालुका खरेदी – विक्री संघाचे संचालक व प्रगतीशील शेतकरी नानासाहेब मारुती नाईकवाडी (वय ५२, रा. नाईकवाडी नगर, अकोले) यांचे लोणी –कोल्हार रस्त्यावर चिंचोली फाटा येथे अज्ञात वाहनाच्या धडकेत अपघाती निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, भाऊ, तीन बहिणी, पुतणे, पुतणी असा मोठा परिवार आहे. अगस्ती कारखान्याचे संचालक बाळासाहेब नाईकवाडी यांचे ते बंधू होत. तर प्रगतिशील शेतकरी स्वप्निल व गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर अनिकेत नाईकवाडी यांचे ते वडील होत. अकोले नगरपंचायतचे नगरसेवक इंजि. प्रदीप नाईकवाडी, काँग्रेसचे युवक तालुकाध्यक्ष अमोल नाईकवाडी यांचे ते चुलते होत. नाना या नावाने ते सर्व दूर परिचित होते. स्पष्ट वक्ते, मिश्कील असा स्वभाव असणारे नाना नाईकवाडी यांचा मोठा मित्रपरिवार होता. त्यांच्या अपघाती निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्यावर अकोले येथील अमरधाम येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईकांना मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टाकळी ढोकेश्वरमध्ये महावितरण कार्यालयाला टाळे ठोको आंदोलन

**प्रलंबित वीज प्रश्नावर 'बांगड्यांचा आहेर' देत संतप्त शेतकऱ्यांचा इशारा । काम सुरू होईपर्यंत आंदोलन सुरूच**

**● पारनेर । वीरभूमी –**

पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या प्रलंबित वीज प्रश्नावरून गेल्या अनेक दिवसांपासून धुमसणाऱ्या असंतोषाचा आज अखेर उद्रेक झाला. 'आरडीएसएस' योजनेतील सिंगल फेज वीज कनेक्शन देण्यास तीन वर्षांपासून होत असलेल्या टाळाटाळीच्या निषेधार्थ टाकळी ढोकेश्वर येथील महावितरणच्या उपअभियंता कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांना 'बांगड्यांचा आहेर' देत कार्यालयाला कुलूप ठोकले.

लोकनेते खासदार निलेश लंके यांच्या माध्यमातून पारनेर तालुक्यासाठी आरडीएसएस योजनेअंतर्गत महत्त्वाची वीज कामे मंजूर झाली होती. मात्र महावितरणच्या अधिकाऱ्यांची उदासीनता व प्रशासकीय दिरंगाईमुळे अनेक गावांतील शेतकऱ्यांना अद्याप अधिकृत वीज कनेक्शन मिळालेले नाही. गेल्या तीन वर्षांपासून शेतकरी हक्काच्या विजेसाठी कार्यालयाचे उंबरठे झिजवत असून, वारंवार पाठपुरावा करूनही केवळ आश्वासने मिळत असल्याने आज शेतकऱ्यांच्या संयमाचा बांध फुटला.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने हे आंदोलन पुकारण्यात आले. म्हसोबा झापचे सरपंच प्रकाश गाजरे, राष्ट्रवादीचे नेते रवींद्र राजदेव आणि अमोल उगले यांच्या नेतृत्वाखाली सकाळी १०:३० वाजल्यापासून शेकडो शेतकरी कार्यालयाबाहेर जमा झाले होते.





रणरणत्या उन्हात साडेतीन तास ठिय्या आंदोलन करण्यात आले. निषेध म्हणून शेतकऱ्यांनी सोबत आणलेल्या बांगड्यांचा आहेर अधिकाऱ्यांना दिला, ज्यामुळे वातावरण तापले होते. तात्काळ काम सुरू करा, अन्यथा कार्यालय उघडू देणार नाही, असा आक्रमक इशारा सरपंच प्रकाश गाजरे यांनी दिला.

या आंदोलनात सरपंच प्रकाश गाजरे, रवींद्र राजदेव, अमोल उगले यांच्यासह सरपंच अभिजीत झावरे, पांडुरंग आहेर, खंडू भाईक, कैलास सैद, प्रवीण सैद, अनिल आहेर, झांबर दरेकर, बाळासाहेब आहेर, संपत वाळुंज, विठ्ठल रोहकले, अशोक वाळुंज, शुभम काळे, दत्तात्रय वाळुंज, राजेंद्र दुधवडे, साहेबराव दुधवडे, संदीप गुंजाळ, काळूराम दुधवडे, लक्ष्मण कारंडे, गिरजु सूळ, लहू वाळुंज, ऋषिकेश वाळुंज, संजय पारधी, लहू भुतांबरे, विष्णू वाळुंज, बाबासाहेब वाळुंज, साहिल वाळुंज, भागचंद वाळुंज यांच्यासह म्हसोबा झाप, वारणवाडी, कामटवाडी, वासुंदे, नांदूर पठार, सावरगाव, पळसपुर, काटाळवेढा, काकणेवाडी, खडकवाडी, पळशी या भागातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या आश्वासनानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.

### तोडगा निघेपर्यंत टाळे कायम; आंदोलकांची भूमिका

■ घटनेची माहिती मिळताच महावितरणचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. मात्र, जोपर्यंत नवीन वीज कनेक्शनच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होत नाही आणि लेखी आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत कार्यालयाचे टाळे उघडले जाणार नाही, असा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला. या आंदोलनामुळे टाकळी ढोकेश्वर परिसरातील महावितरणचे कामकाज पूर्णपणे ठप्प झाले होते. 'बांगड्यांचा आहेर' देत करण्यात आलेले हे आंदोलन सध्या संपूर्ण तालुक्यात चर्चेचा विषय ठरले आहे.

### अरेरावीची भाषा करणाऱ्या अधिकाऱ्याच्या निलंबनाची मागणी

■ टाकळी ढोकेश्वर येथील महावितरणचे अधिकारी देशमुख यांना निलंबित करावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. संबंधित अधिकारी शेतकऱ्यांशी अरेरावीची भाषा करत असल्याचा आरोप करण्यात आला असून, याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. या अधिकाऱ्याविरोधातील तीव्र नाराजी आंदोलनातून स्पष्टपणे दिसून आली.

## कोपरगाव मतदारसंघातील पोलिस दलात निवडीबद्दल कोपरगाव पालिकेकडून संजय दिघे, कु. मेघा वाघमारे यांचा सन्मान

**● कोपरगाव । वीरभूमी–**

कोकमठाण गावचे सुपुत्र माजी सैनिक संजय दिघे यांची अहिल्यानगर पोलीस कॉन्स्टेबल पदी तर कु. मेघा वाघमारे यांची बीड जिल्ह्यात पोलीस कॉन्स्टेबल पदी निवड झाल्याबद्दल कोपरगाव नगरपालिकेचे नगराध्यक्ष पराग संधान यांच्यावतीने नगरपालिकेत सन्मान करण्यात आला. यावेळी नगरपालिकेच्या वतीने राज्याची सेवा करण्यासाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या आहे. यासह संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, मा.आ. स्नेहलताताई कोल्हे,युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनीही या निवडीबद्दल हार्दिक अभिनंदन केले आहे.



कोकमठाण गावचे सुपुत्र तथा माजी सैनिक संजय दिघे तसेच कु. मेघा वाघमारे हे दोघेही विद्यार्थी कोपरगाव नगरपालिकेच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाचे विद्यार्थी असून त्यांनी याच ठिकाणाहून मेहतीने अभ्यास करत महाराष्ट्र पोलीस भरतीची तयारी केली. त्यांच्या या जिद्द व चिकाटीमुळे यावर्षी झालेल्या पोलीस भरतीच्या लेखी व ग्राउंडमध्ये त्यांना चांगले मार्क मिळवून ते उत्तीर्ण झालेले आहेत. दोघेही अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून पोलीस सेवेत सहभागी झालेले आहेत. दोघांचाही विशेष सन्मान करत या निवडीचा खूप मोठा अभिमान वाटत असल्याचे नगराध्यक्ष पराग संधान यांनी सांगितले.

यावेळी सर्वांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी कोपरगाव नगरपालिकेचे नगराध्यक्ष पराग संधान यांच्यासह नगरसेवक, भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी तसेच कोपरगाव शहरातील समस्त कार्यकर्ते आदी मोठ्या संख्येने सत्कार समारंभास उपस्थित होते.

## खरीप हंगामासाठी खतांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवा

**जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे निर्देश**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये शेतकऱ्यांना वेळेत व पुरेशा प्रमाणात खते उपलब्ध होण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने वितरण करण्यात यावे. खतांचा तुटवडा निर्माण होणार नाही याची दक्षता घेत काळाबाजार, साठेबाजी व अनियमितता रोखण्यासाठी कठोर उपाययोजना राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित 'जिल्हास्तरीय कृषी निविष्ठा नियोजन व वितरण व्यवस्थापन समिती'च्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, कृषी विकास अधिकारी सुधीर शिंदे यांच्यासह सर्व तालुका कृषी अधिकारी, खत उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच कृषी विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया पुढे म्हणाले की, जिल्ह्यात खतांची टंचाई निर्माण होणार नाही, याची कृषी विभागाने दक्षता घ्यावी. शेतकऱ्यांना खतांचे समान वितरण होईल यादृष्टीने सुयोग्य नियोजन करण्यात यावे. खतांची जादा दराने विक्री, खतांचे लिंकिंग असे गैरप्रकार आढळून आल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

या बैठकीत जिल्ह्यातील खत साठ्याची सद्यस्थिती, मागणी, मंजूर आवंटन आणि संरक्षित (बफर) साठा यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. सध्या जिल्ह्यात १९ हजार ६७४ मेट्रिक टन युरिया, ८ हजार ७४३ मेट्रिक टन डीएपी, ४ हजार ८३६ मेट्रिक टन एमओपी, ८८ हजार ६९१ मेट्रिक टन संयुक्त खते तसेच २५ हजार ६३३ मेट्रिक टन एसएसपी असा एकूण १ लाख ४७ हजार ६३५ मेट्रिक टन खत साठा शिल्लक आहे. तसेच आगामी हंगामासाठी एकूण ७ हजार ९०० मेट्रिक टन युरिया व ८५० मेट्रिक टन डीएपी खताचा संरक्षित (बफर) साठा ठेवण्यात आला आहे.

तालुकानिहाय युरिया बफर साठ्याचे नियोजन करण्यात आले असून, त्यानुसार नगर – ५१३ मेट्रिक टन, पारनेर – ५३७, पाथर्डी – ५५८, जामखेड – ५२६, श्रीगोंदा – ५७१, कर्जत – ५५८, श्रीरामपूर – ४९५, राहुरी – ४८६, नेवासा – ५९६, शेवगाव – ५९६, संगमनेर – ६६०, अकोले – ७७७, कोपरगाव – ५२८ व राहाता – ४५० मेट्रिक टन असे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी दिली.

# अकोलेत पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महा अभियानाचे उद्घाटन

**● अकोले । वीरभूमी–**

भारताला स्वातंत्र्य रक्त सांडून मिळाले असून, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी स्वातंत्र्यासाठी प्रचंड संघर्ष केला आहे. मात्र, भारतीय संविधानाचे काँग्रेस आणि नेहरू–गांधी घराण्याने खून केले आहे, असे मत भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यालय प्रभारी श्री. रवीजी आनासपुरे यांनी व्यक्त केले.

ते अकोले येथे आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महा अभियानाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजूरच्या माजी सरपंच श्रीमती हेमलता पिचड होत्या. यावेळी अकोले एज्युकेशन संस्थेचे कायम विश्वस्त गिरजाजी जाधव, अध्यक्ष सुनील दातीर, सचिव सुधाकर देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष यशवंत आभाळे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

संविधानासाठी लढणारा भाजपा हा पक्ष आहे. काँग्रेसच्या काळात अनेक वेळा संविधानात बदल करण्यात आले आहेत. भाजपा कार्यकर्ता सत्ता ही सेवेसाठी मानतो. भाजपा हा कार्यकर्त्यांच्या त्यागावर उभारलेला पक्ष असून, पक्षातील पदे ही मिरवण्यासाठी नसून दायित्वाची असतात, असेही मत रवीजी आनासपुरे यांनी व्यक्त केले.

या प्रशिक्षण महा अभियानात सहा सत्रांमध्ये कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष श्री. रोहित चौधरी यांनी वैचारिक अधिष्ठानावर भाष्य केले; यावेळी सोमदास पवार अध्यक्षस्थानी होते. भाजपा इतिहास आणि पक्षाचा विस्तार या विषयावर जिल्हा महामंत्री सीताराम भांगरे यांनी मार्गदर्शन केले, त्यावेळी अगस्ती साखर कारखान्याचे माजी संचालक भाऊसाहेब वाकचौरे अध्यक्षस्थानी होते.

बूथ व्यवस्थापन आणि मन की बात या विषयावर जिल्हा सचिव सोनाली नाईकवाडी यांनी मार्गदर्शन केले; यावेळी माजी तालुकाध्यक्ष धनंजय संत अध्यक्षस्थानी होते. सोशल मीडिया आणि इतर कार्य या विषयावर सोशल मीडिया सेलचे जिल्हा संयोजक भाऊसाहेब वाकचौरे यांनी मार्गदर्शन केले,



त्यावेळी भाऊसाहेब आभाळे अध्यक्षस्थानी होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अकोले मंडल अध्यक्ष राहुल देशमुख, कोतुळ मंडल अध्यक्ष बाळासाहेब सावंत, देवठाण मंडल अध्यक्ष वाल्मीक नवले, सरचिटणीस संतोष तिकांडे, प्रकाश कोरडे, माधव ठुबे आणि अशोक आवारी यांनी विशेष प्रयत्न केले.

समारंभाची सांगता प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धक कार्यशाळेने झाली, ज्यामध्ये भाजपा कार्यकर्त्यांना पक्षाच्या इतिहास, ध्येय आणि कार्यप्रणालीच्या विविध पैलूंवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

# शिवदुर्ग ट्रेकर्सचा १०० गडकोटांचा ऐतिहासिक टप्पा; श्रीगोंद्यात शतक महोत्सव उत्साहात

**सह्याद्रीतील भटकंती मोहिमेचा गौरव सोहळा । विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

ग्रामीण भागातील तरुणांना सोबत घेऊन सह्याद्रीतील १०० गडकोटांची यशस्वी ट्रेकिंग मोहिम पूर्ण केल्याबद्दल शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनतर्फे पिकनिक पॉइंट, श्रीगोंदा येथे भव्य शतक महोत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

२०१८ साली किल्ले धर्मवीरगड येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्यस्तंभास मानवंदना देऊन सुरू झालेल्या या मोहिमेचा १५ मार्च २०२६ रोजी किल्ले शिवनेरी येथे १०० गडकोटांची अभ्यासपूर्ण भटकंती पूर्ण करून ऐतिहासिक टप्पा गाठण्यात आला. या उल्लेखनीय कार्याबद्दल संस्थेच्या तरुण मावळ्यांच्या उपस्थितीत शतक महोत्सव साजरा करण्यात आला.

या सोहळ्यास माजी मंत्री बबनराव पाचपुते प्रमुख उपस्थित होते. तसेच नगराध्यक्षा सुनिता खेतमाळीस, नगरसेवक एम. डी. शिंदे, चांदणी खेतमाळीस, शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष बबन गाडेकर, डॉ. संदीप मोटे, उद्योजक गणेश होळकर, राजू उकांडे, बार असोसिएशनचे अध्यक्ष जयंत शिंदे, शिवव्याख्याते लक्ष्मण नाईकवडी यांसह तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, डॉक्टर, वकील आणि शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात प्रतिभा इथापे यांनी साकारलेली आकर्षक रांगोळी विशेष लक्षवेधी ठरली. शिवव्याख्याते योगेश मांडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गडकोटांचे महत्त्व, ट्रेकिंगची जबाबदारी आणि वारसा संवर्धन यावर प्रभावी व्याख्यान दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. चंद्रशेखर कळमकर यांनी केले, तर अध्यक्षस्थान ड. गोरख कडूस यांनी भूषविले. सूत्रसंचालन मारुती वागस्कर व प्रा. भरत खोमणे यांनी केले, तर आभार दिगंबर भुजबळ यांनी मानले. या ऐतिहासिक सोहळ्याच्या यशस्वी





आयोजनासाठी शिवदुर्ग संचालक मंडळ, महाराष्ट्र बारव मोहिम आणि शिवदुर्ग वारसा संवर्धन समितीच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

> शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनच्या माध्यमातून गेल्या २९५१ दिवसांत ५४५१ सदस्यांच्या सहभागातून १२ युनेस्को मानांकित वारसा किल्ल्यांना भेट देण्यात आली आहे. महाराष्ट्रातील १३ जिल्ह्यांतील १०० किल्ल्यांवर गडपूजन, महाराष्ट्र गीतगायन आणि गडांवरील सुमारे ७५० गोण्या प्लास्टिक संकलनासारखी उल्लेखनीय कामगिरी संस्थेने केली आहे. याशिवाय वारसा जतन, बारव संवर्धन यासाठीही मोठी तरुणाई तयार करण्यात संस्थेला यश आले आहे. ग्रामीण भागात अशा प्रकारचे शिवकार्य उभे करणारी ही पहिलीच संस्था आहे.
>
> – **राजेश इंगळे,** अध्यक्ष, शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन

# घोड धरणातील पाणी साकळाई योजनेकडे वळविण्याच्या प्रस्तावाला श्रीगोंद्यातील शेतकऱ्यांचा विरोध

## श्रीगोंद्यात लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांची बैठक । हक्काच्या पाण्यासाठी आंदोलनाचा इशारा

**श्रीगोंदा । वीरभूमी –**

घोड धरणातून साकळाई उपसा सिंचन योजनेस पाणी देण्याच्या प्रस्तावामुळे घोड लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर श्रीगोंदा येथे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांची सोमवार दि. ६ रोजी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीस परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. घोड धरणातील पाणीसाठा आधीच अपुरा असल्याचे नमूद करत, सध्याच्या परिस्थितीत बाहेरील योजनेस पाणी वळविल्यास स्थानिक शेती, पिकांचे उत्पादन आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली. घोड लाभक्षेत्रातील हजारो हेक्टर शेती या धरणावर अवलंबून असून, साकळाई योजनेस पाणी दिल्यास स्थानिक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होईल तसेच भविष्यात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली.



बैठकीत सर्वानुमते ठरविण्यात आले की, घोड धरणातील पाणी प्रथम स्थानिक शेतकऱ्यांच्या हक्कासाठी राखीव ठेवण्यात यावे आणि कोणत्याही परिस्थितीत साकळाई उपसा सिंचन योजनेस पाणी देऊ नये. यासंदर्भात शासन व प्रशासनाला निवेदन देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच, मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला.

या बैठकीस राकेश पाचपुते, स्वराज्य जनजागृती अभियानचे जिल्हाध्यक्ष टिळक भोस, स्मितल वाबळे, ॲड. विठ्ठलराव काकडे, विजय शेंडे, अजय वाबळे, राजेंद्र नागवडे, बापू भुजबळ, गोरख उंडे, सुभाष शिंदे, शहाजी इथापे यांसह अनेक शेतकरी उपस्थित होते.

### योजना व्हावी; पण पाणीसाठा पाहता शंका

■ साकळाई उपसा सिंचन योजना व्हावी यासाठी आम्हीही आंदोलन केले आहे. मात्र सध्याच्या घोड धरणातील पाणीसाठ्याची स्थिती पाहता उन्हाळ्यात साकळईसाठी पाणी मिळेल का, याबाबत शंका आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. त्यांना योग्य माहिती देणे आवश्यक आहे.

– **टिळक भोस**, जिल्हाध्यक्ष, स्वराज्य जनजागृती अभियान

### टेलच्या शेतकऱ्यांपर्यंत पाणीच पोहोचत नाही

■ घोडच्या पाण्याच्या रोटेशनमध्ये टेल भागातील शेतकऱ्यांना शेवटचे सहा–सात दिवसच पाणी मिळते. तेही पूर्णपणे पोहोचत नाही. अशा परिस्थितीत इतर योजनेस पाणी देणे अशक्य आहे.

– **गोरख उंडे**

### बारमाही सिंचनावरून दोन-तीन रोटेशनवर स्थिती

■ घोड धरणावर आधारित बारमाही सिंचन आता दोन–तीन रोटेशनवर आले आहे. त्यामुळे शेतकरी उध्वस्त होण्याच्या मार्गावर असून, हक्कासाठी लढा उभारावा लागेल. आता आरपारची लढाई होणार आहे.

– **स्मितल वाबळे**, जिल्हाध्यक्ष, युवक काँग्रेस

### प्रशासकीय व कायदेशीर लढा देणार

■ घोड धरणात पाण्याची कमतरता असल्याने साकळई योजना यशस्वी होणार नाही. यासाठी अभ्यासपूर्ण भूमिका घेऊन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व जलसंपदा मंत्र्यांची भेट घेणार आहोत. आवश्यक असल्यास न्यायालयीन लढाही उभारला जाईल.

– **ॲड. विठ्ठलराव काकडे**

## कोपरगावात कर्मवीर शंकररावजी काळे यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**कोपरगाव । वीरभूमी –**

सहकार, शिक्षण, कृषी, सिंचन, सामाजिक व राजकीय क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा आनमोल ठसा उमटवणारे आणि रयत शिक्षण संस्थेच्या प्रसारात स्वतःला झोकून देऊन ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी गावोगावी शाळा आणि महाविद्यालयांचे जाळे विणणारे माजी खासदार कर्मवीर शंकररावजी काळे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त कोपरगाव शहरातील पंचायत समिती कार्यालयाच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या कर्मवीर शंकररावजी काळे यांच्या पूर्णाकृती स्मारकास आमदार आशुतोष काळे यांनी असंख्य कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.




याप्रसंगी कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे व्हा.चेअरमन छबुराव आव्हाड, कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळाचे अध्यक्ष कारभारी आगवण, कैलास ठोळे, महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव धरमचंद बागरेचा, सतीश कृष्णानी, माजी उपसभापती मधुकर टेके, शिवाजीराव ठाकरे, डॉ.अजय गर्जे, मा.नगरसेवक मंदार पहाडे, राजेंद्र वाकचौरे, हाजीमहेमूद सय्यद, जनार्दन कदम, संदिप कपिले, शैलेश साबळे, राहुल शिरसाठ, इम्तियाज अत्तार, बाळासाहेब रुईकर, विरेन बोरावके, रमेश गवळी, सुनिल शिलेदार, फकीर कुरेशी, अजीज शेख,विजय त्रिभुवन, बाळासाहेब आढाव, सुनिल बोरा, डॉ.चंद्रशेखर आव्हाड, सचिन गवारे, मनोज नरोडे, सागर आहेर, सोमनाथ आढाव, शुभम काळे, मुकुंद भूतडा, सुनिल फंड, चंद्रशेखर म्हस्के, प्रकाश दुशिंग, एकनाथ गंगुले, विजय बंब, ठकाजी लासुरे, प्रदीप कुऱ्हाडे, प्रशांत वाबळे, चांगदेव आगवण, राजेंद्र आभाळे, दिनकर खरे, विकास बेंद्रे, राजेंद्र खैरनार, सचिन परदेशी, मनोज कडू, संतोष शेलार, चंद्रकांत धोत्रे, दिनेश संत, सचिन ठोळे, भाऊसाहेब भाबड, विकास मांढरे, शुभम लासुरे, निलेश बोरुडे, गणेश बोरुडे, विकास आढाव, लक्ष्मण सताळे, सिद्धार्थ शेळके, अनिल बनसोडे, मयूर राऊत, राजेंद्र साठे, अभिषेक भाबड, रवी देवरे, प्रशांत मोरे, मयुरेश शिंदे, हारुण शेख, वैभव कानडे आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि रयत शिक्षण संस्थेचे प्राचार्य, मुख्याध्यापक, रयत सेवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खरीप हंगाम २०२५-२६ अंतर्गत धान्य खरेदीस प्रारंभ; शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

राज्य शासनाच्या वतीने महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई मार्फत खरीप हंगाम २०२५–२६ अंतर्गत केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार मका, बाजरी, रागी, ज्वारी (मालदांडी व संकरीत) या पिकांची खरेदी सुरू करण्यात आली आहे. याची नोंदणी दि. १ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत करता येईल, तर प्रत्यक्ष खरेदी दि. १ मे २०२६ ते ३० जून २०२६ पर्यंत राहील, अशी माहिती जिल्हा पणन अधिकारी एच.डी. पवार यांनी दिली आहे.

भरडधान्यांचा हमीभाव खालीलप्रमाणे : मका २ हजार ४०० रुपये प्रति क्विंटल, बाजरी २ हजार ७७५ रुपये, रागी ४ हजार ८८६ रुपये, ज्वारी मालदांडी ३ हजार ७४९ रुपये व ज्वारी संकरीत ३ हजार ६९९ रुपये या दराने खरेदी करण्यात येणार आहे. जिल्ह्यात कृषी विभागामार्फत प्राप्त पीक पेरणीच्या माहितीनुसार मका व ज्वारी खरेदीसाठी विविध खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांची नोंदणी व प्रत्यक्ष खरेदी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच ज्या तालुक्यांमध्ये अद्याप खरेदीदार संस्था नाहीत, त्या तालुक्यांना जवळील खरेदी केंद्रांशी जोडण्यात आले आहे.



जिल्ह्यात अहिल्यानगर तालुक्यासाठी साईकृपा पणन सहकारी संस्था; श्रीगोंदा तालुक्यासाठी संभाजीराजे बहुउद्देशीय सहकारी संस्था (घुटेवाडी), सखुबाई विविध कार्यकारी सेवा सोसायटी (घोगरगाव) व श्रीदत्तकृपा पणन सहकारी संस्था मर्यादित (घारगाव); कर्जत तालुक्यासाठी अंध दिव्यांग उद्योजक सेवाभावी संस्था (मिरजगाव); पाथर्डी तालुक्यासाठी अकोले परिसर सहकारी दूध उत्पादक सहकारी संस्था (अकोले) तर कोपरगाव तालुक्यासाठी बहादराबाद विविध कार्यकारी सहकारी सोसायटी (रांजणगाव देशमुख) येथे नोंदणी व खरेदी केली जाणार आहे.

तसेच पारनेर, राहाता व राहुरी या तालुक्यांमधील शेतकऱ्यांना जवळील खरेदी केंद्रांशी संलग्न करण्यात आले असून, श्रीगोंदा केंद्राशी पारनेर, कोपरगाव केंद्राशी राहाता आणि पाथर्डी केंद्राशी राहुरी तालुके जोडण्यात आले आहेत. त्यामुळे संबंधित तालुक्यांतील शेतकऱ्यांनी जवळील खरेदी केंद्रावर जाऊन नोंदणी करून आपल्या पिकांची विक्री करावी, असेही कळविण्यात आले आहे.

## जनगणनेचे काम अचूक पूर्ण करा : जिल्हाधिकारी डॉ. आशिया

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

आगामी जनगणना–२०२७ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात तयारीला वेग आला असून यावेळची जनगणना पूर्णपणे कागदरहित व डिजिटल पद्धतीने पार पडणार आहे. त्यामुळे नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणाद्वारे तांत्रिक बाबी सखोल समजून घेऊन जनगणनेचे कार्य अचूक व वेळेत पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.



अहिल्यानगर येथील इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी येथे जनगणनेचे जिल्हास्तरीय प्रशिक्षण सुरू आहे. जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी प्रशिक्षण केंद्राला भेट देत तयारीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून मार्गदर्शन केले.

जनगणनेचे काम करताना कोणतीही त्रुटी राहू नये व प्रक्रियेत पारदर्शकता राखली जावी, यावर त्यांनी विशेष भर दिला. कर्मचाऱ्यांनी डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करावा. तसेच डेटा संकलनाची पद्धत नीट समजून घेऊन फिल्डवर काम करताना येणाऱ्या अडचणींवर तत्काळ उपाययोजना कराव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या. सर्वांनी समन्वयाने व जबाबदारीने काम करण्याचेही त्यांनी आवाहन केले.

या मोहिमेअंतर्गत ६ ते १५ एप्रिल २०२६ या कालावधीत तीन टप्प्यांत अधिकाऱ्यांना सखोल मार्गदर्शन करण्यात येत आहे. चार मास्टर ट्रेनर्समार्फत एकूण १४२ फिल्ड ट्रेनर्सना प्रशिक्षण दिले जाणार असून प्रत्यक्ष कामाची प्रात्यक्षिकेही दाखविण्यात येत आहेत.

यावेळी महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, तहसीलदार नागेश गायकवाड, जामखेड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजय महादेव साळवे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, मास्टर ट्रेनर्स व प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संतांचा महिमा पंडित, आचार्य, विद्वान यांनाही कळण्यास कठीण : मधुसूदन गिरी महाराज

**कोपरगाव । वीरभूमी –**

संत हे समाजाचे, जड जीवांचे कल्याण व्हावे, त्यांचा उद्धार व्हावा याकरता येत असतात . अज्ञानाचा नाश करण्यासाठी ते वैकुंठातून येतात त्यांचा महिमा दुर्गम आहे असे प्रतिपादन हरिभक्त परायण मधुसूदन गिरी महाराज यांनी केले आहे.

तालुक्यातील लौकी येथे अखंड हरिनाम सप्ताह निमित्त कीर्तन सेवा प्रसंगी ते बोलत होते. संतांचा महिमा तो बहु दुर्गम या तुकाराम महाराजांच्या अभंगाचे निरूपण करताना ते म्हणाले की, सूर्याच्या प्रकाशाने व दिव्याच्या प्रकाशांनी जे दृश्यपदार्थ आहेत त्याचे ज्ञान होते परंतु संत अदृश्य तत्त्वाचे दर्शन करून देतात म्हणून त्यांचा महिमा दुर्गम आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ यांच्या ज्ञान,त्याग आणि वैराग्यातून उभा राहिलेला हा वारकरी संप्रदाय आहे. तो आज विकला जात आहे तर काहींनी त्याचा बाजार मांडलेला आहे. परंतु हा बाजार कधीतरी उठणारच आहे.

संतांचा महिमा भिंत चालवली म्हणून दुर्गम आहे, रेडा मुखी वेद बोलविला म्हणून दुर्गम आहे, ९००० ओव्यांचा ग्रंथ मेलेल्या माणसाला जिवंत करून लिहून घेतला म्हणून दुर्गम आहे, २२ व्या वर्षी जिवंत समाधी घेतली म्हणून दुर्गम आहे, इंद्रायणी नदीत बुडवलेला अभंगाचा गाथा तेरा दिवसांनी जसाच्या तसा वर आला म्हणून दुर्गम आहे. पंडित, आचार्य, विद्वान यांना संत महिमा कळेलच असेही नाही असे महाराजांनी यावेळी सांगितले.

सदर प्रसंगी संगीत साथ, रोहित महाराज, वसंत महाराज भाकरे, सांबरे महाराज गलांडे महाराज आदींनी केली. यावेळी आमदार आशुतोष काळे, सरपंच आजिनाथ खटकाळे , यशवंतराव कदम, दिगंबर जाधव, बाबासाहेब खिलारी, मेजर खटकाळे, प्रकाश गायकवाड आदी भाविक उपस्थित होते.

# मुलींना आई-वडील सांभाळण्याचा अधिकार दिला असता तर वृद्धाश्रमांची गरज भासली नसती

## बडेवाडी नारळी सप्ताहात प्रकाश महाराज साठे यांचे प्रतिपादन । भागवत कथेला अलोट गर्दी

**पाथर्डी । वीरभूमी–**

प्रत्येक मुलीला आई–वडिलांची जबाबदारी सांभाळण्याचा समान अधिकार दिला गेला असता, तर समाजातील कोणत्याही आई–वडिलांना वृद्धाश्रमात जाण्याची वेळ आली नसती. तसेच सुनेने सासू–सासऱ्यांची मनापासून सेवा केली, तर वृद्धाश्रम ही संकल्पनाच उरणार नाही, असे प्रभावी प्रतिपादन कथाकार हभप प्रकाश महाराज साठे यांनी केले.

पाथर्डी तालुक्यातील बडेवाडी येथे संत भगवान बाबा यांनी प्रारंभ केलेल्या ९२ व्या फिरत्या नारळी सप्ताहानिमित्त आयोजित भागवत कथेच्या कार्यक्रमात ते बोलत होते. हा सप्ताह महंत डॉ. नामदेव शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, यावेळी परिसरातील विविध गावांमधून आलेल्या भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

प्रकाश महाराज साठे यांनी आपल्या ओघवत्या व प्रभावी वाणीतून कुटुंबव्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित केले. बदलत्या जीवनशैलीमुळे कुटुंबातील नातेसंबंधांमध्ये दुरावा निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. आई–वडिलांची सेवा ही केवळ मुलांचीच जबाबदारी आहे, हा समाजातील गैरसमज असल्याचे सांगत त्यांनी स्पष्ट केले की, मुलींनाही तेवढ्याच हक्काने व प्रेमाने ही जबाबदारी पार पाडता येते. योग्य संधी व पाठबळ मिळाल्यास मुली अधिक जिव्हाळ्याने आई–वडिलांची सेवा करतात, असे त्यांनी सांगितले.

स्त्रीभ्रूण हत्येसारख्या गंभीर सामाजिक प्रश्नावर त्यांनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला. स्त्रीभ्रूण हत्या ही समाजासाठी घातक प्रवृत्ती असून ती तात्काळ थांबवली पाहिजे. मुलगी हीच कुटुंबाचा खरा आधार ठरू शकते. कन्यादानाच्या रूपाने ती वडिलांचे ऋण फेडते. त्यामुळे मुलगा–मुलगी असा भेदभाव न करता दोघांनाही समान संधी, शिक्षण आणि सन्मान दिला पाहिजे, असे ते म्हणाले.



तसेच सून–सासू–सासरे यांच्यातील नातेसंबंधांवर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, सून जर सासू–सासऱ्यांची सेवा आपल्या आई–वडिलांप्रमाणे करत असेल, तर घरात प्रेम, आपुलकी आणि समाधान नांदते. अशा सुदृढ कुटुंबव्यवस्थेमुळे वृद्धाश्रमांची गरज भासत नाही, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी संत भगवान बाबा यांच्या शिकवणीचा संदर्भ देत समाजात सदाचार, कर्तव्यनिष्ठा आणि सेवाभाव जोपासण्याचे आवाहन केले.

सप्ताहाच्या निमित्ताने परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, महिला भाविकांचा मोठा सहभाग विशेष लक्षणीय ठरत आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बडेवाडी ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

### अवकाळीने उघडीप दिल्याने दिलासा

■ बडेवाडी येथे मोठ्या उत्साहात सप्ताह सुरू झाला. अवकाळी पावसामुळे काही काळ ग्रामस्थांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती; मात्र पावसाने उघडीप दिल्यानंतर ग्रामस्थांना दिलासा मिळाला. मोठ्या जिद्दीने व उत्साहात आलेल्या भाविकांसाठी सप्ताहाच्या यज्ञ मंडपात अन्नदान सुरू असून, कथा व कीर्तन मंडपात भाविकांनी अलोट गर्दी केली आहे. बडेवाडीचा शिवार वारकरी व भाविकांनी फुलून गेला आहे. विविध गावांमधून दररोज ट्रॅक्टर, पिकअप, रिक्षाद्वारे भाकरी, चपाती, बुंदी, बर्फी, लाडू आदी प्रसाद आणून पंगतीद्वारे महाप्रसाद वाटप करण्यात येत आहे.